<u>नि.फौ.ख.क्र. ३९२/२०१२</u>
शासन –वि– अमोल व इतर.
नि.क्र.८०.

## दो षा रो प

मी ए.ए.उत्पात, न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, कराड तुमच्यावर दोषारोप ठेवतो,

१. **अमोल चंद्रकांत लवटे,**
वय– २७ वर्षे, कामधंदा– शेती,

२. **जगुताई चंद्रकांत लवटे,**
वय– ४७ वर्षे, कामधंदा– घरकाम,

३. **लता अमोल लवटे (फरार),**
वय– २२ वर्षे, कामधंदा– घरकाम,
सर्व रा. मुंढे, ता.कराड, जि.सातारा.

तो खालीलप्रमाणेः–

पहिले असे की, दि.२१/०३/२०१० रोजीचे १५ दिवसापासून ते दि.१२/०९/२०१२ रोजीचे रात्री २०.०० वाजणेचे सुमारास, तुम्ही आरोपी क्र.०१ ते ०३ यांनी आपसांत संगनमत करुन खबर देणार हिला, ''तुला घरातील काम नीट येत नाही तसेच गायी खरेदी करणेसाठी रक्कम रुपये ५० हजार माहेराहुन घेवुन ये'' असे म्हणुन मारहाण व शिवीगाळ करुन, उपाशी पोटी ठेवुन शरिरीक व मानसिक छळ करुन क्रूर वागणूक देवुन घरातुन हाकलुन दिले व त्यानुषंगाने आरोपींनी भारतीय दंड संहिता, कलम ४९८(अ) सह ३४ अन्वये शिक्षेस पात्र गुन्हा केला व मी त्याची दखल घेतली आहे.

दुसरे असे की, वर नमूद तारीख, वेळ व ठिकाणी तुम्ही आरोपींनी आपसांत संगनमत करुन खबर देणार हिस वेळोवेळी मारहाण करुन दुखापत पोहोचवली व त्या अनुषंगाने तुम्ही भारतीय दंड संहिता, कलम ३२३ सह कलम ३४ अन्वये शिक्षेस पात्र गुन्हा केला व मी त्याची दखल घेतली आहे.

तिसरे असे की, वर नमूद तारीख, वेळ व ठिकाणी तुम्ही आपसांत संगनमत करुन, आरोपी क्र.१ याने पहिली पत्नी हयात असताना आरोपी नं.३ सौ.लता नामक स्त्रीशी दुसरा विवाह केला व त्या अनुषंगाने तुम्ही भारतीय दंड संहिता, कलम ४९४ सह कलम ३४ अन्वये शिक्षेस पात्र गुन्हा केला व मी त्याची दखल घेतली आहे.

चौथे असे की, वर नमूद तारीख, वेळ व ठिकाणी, तुम्ही आरोपींनी आपसांत संगनमत करुन खबर देणार हिचे हातून शांतता भंग किंवा अपराध घडवून आणण्याच्या उद्देशाने त्यांना शिवीगाळ करुन त्यांचा उद्देशपूर्वक अपमान केला व त्यांना प्रक्षोभीत केले व त्यानुषंगाने तुम्ही भारतीय दंड संहिता, कलम ५०४ सह कलम ३४ अन्वये शिक्षेस पात्र गुन्हा केला व मी त्याची दखल घेतली आहे.

शेवटचे असे की, वर नमूद तारीख, वेळ व ठिकाणी, तुम्ही आरोपींनी आपसांत संगनमत करुन खबर देणार हिस धमकी देवून फौजदारीपात्र धाकदपटशा केला व त्या अनुषंगाने तुम्ही भारतीय दंड संहिता, कलम ५०६ सह कलम ३४ अन्वये शिक्षेस पात्र गुन्हा केला व मी त्याची दखल घेतली आहे.

मी तुम्हास या द्वारे निर्देशित करतो की, वरिलप्रमाणे तुमच्या विरुध्द खटला चालविण्यात येईल.

UTPAT ATUL ARUN
Digitally signed by UTPAT ATUL ARUN
Date: 2026.07.10 16:19:35 +0530

(ए.ए. उत्पात)

दि.१०/०७/२०२६. न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, कराड

(कोर्ट क्र.०४)

वरील दोषारोप आरोपींना मराठी भाषेत वाचुन समजाविला.

UTPAT ATUL ARUN
Digitally signed by UTPAT ATUL ARUN
Date: 2026.07.10 16:19:41 +0530

(ए.ए. उत्पात)

दि.१०/०७/२०२६. न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, कराड

(कोर्ट क्र.०४)